| **नियमित दिवाणी दावा क्र.७९०/२०२३ मधील निशाणी क्र.१८ खालील आदेश (सविता विजय चौधरी व इतर विरुध्द शिवाजी चांगदेव ब-हाटे व इतर)** | MHAH140011192023 |
| --- | --- |

वादींने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रूल १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करणेकरीता दाखल केला आहे. अर्जासोबत वादीने शपथपत्र जोडलेले आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये वादींने कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ हा दिनांक १०/१०/२०२३ रोजी हजर झाल्यानंतर कैफियत देण्यासाठी मुदत मागितली. त्यानंतर देखील वेळोवेळी प्रतिवादीने अर्ज दिले. दिनांक ०३/०४/२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १ याने पत्नीस हाताशी धरून मुलांच्या नावाने रे.मु.नं. १२३/२०२४ हा दावा दाखल केला व त्यामध्ये बेकायदेशीर वाटप केले. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात रे.मु.नं. १२३/२०२४ मधील वादींना प्रतिवादीपणात सामील करणे आवश्यक आहे. तसेच त्या अनुषंगाने दाव्याच्या टायटलमध्ये "जाहिर ठरावासाठी" अशी दुरूस्ती व दावा कलम ३ नंतर नवीन कलम ३अ व विनंती कलमामध्ये दावा कलम ९अ नंतर नवीन कलम ९अ१ अशी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. वादीने पुढे कथन केले आहे की, वरीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी न दिल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल. याउलट दुरूस्ती करण्यास परवानगी दिल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादींतर्फे निशाणी क्र. २२ वर म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज बेकायदेशीर असून वादी म्हणतात त्याप्रमाणे कधीही परिस्थीती नसल्याने कायदेशीर नाही. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होणार आहे. दाव्यामध्ये गुंतागुंत वाढणार आहे. वादी केवळ असे अर्ज देवून दाव्याचे कामकाज लांबवित आहे.वादींना कायद्याने सदरची

दुरूस्ती करता येणार नाही कारण रे.मु.नं. १२३/२०२४ यामध्ये प्रतिवादी व त्याची मुले यांच्यामध्ये तडजोड होवून प्रतिवादी यांन हिस्सा देण्यात आलेला आहे. त्यांची नावे ७/१२ उता–याला लागलेली आहेत. दावा मिळकतीशी वादींचा कायद्याने संबंध नाही. वादी कधीही एकत्र कुटूंबाचे सदस्य नव्हते. त्यामुळे त्यांना दावा मिळकतीमध्ये हिंदू वारसा कायद्याप्रमाणे हक्क नाही. रे.मु.नं. १२३/२०२४ यामध्ये कायदेशीररित्या वाटप होवून नोंदी झालेल्या आहेत. त्यास वादींने हरकत घेतलेली नाही. सबब, वरील संपूर्ण परिस्थीती पाहता वादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादीं तर्फे मा. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. प्रस्तुत दावा हा अद्याप पुराव्याला लागलेला नसून निशाणी क्र. ५ वरील अर्जावर युक्तीवादासाठी प्रलंबीत आहे. तसेच, वादींने प्रस्तुत दावा हा वडीलोपार्जीत मिळकतीचे वाटप होवून त्यांचा हिस्सा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरूप पाहता दावा वाटपासाठी असून दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत एकत्र कुटूंबाची मिळकत आहे असे वादींने कथन केले आहे. याउलट प्रतिवादी यांच्या कथनानुसार दावा मिळकत ही त्यांची आजी गंगूबाई पांडूरंग ब–हाटे हिची स्वतंत्र मिळकत होती. दावा मिळकत ही वडीलोपार्जीत एकत्र कुटूंबाची मिळकत आहे की स्वतंत्र मिळकत आहे हा वादाचा मुद्दा आहे. सदरचा मुद्दा हा दोन्ही बाजूकडील पुरावा घेतल्याशिवाय निकाली काढता येणार नाही. परंतु, सद्यस्थितीत दावा मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत आहे असे प्रथमदर्शनी गृहीत धरणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत दावा हा दिनांक २२/०८/२०२३ रोजी दाखल केला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ हा दिनांक १०/१०/२०२३ रोजी हजर राहिला. दिनांक ०३/०४/२०२४ रोजी प्रतिवादीने विनाकैफियत आदेश रद्द करण्याकरीता अर्ज दिला व त्यावर आदेश पारीत होवून दिनांक १६/११/२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १ याची कैफियत अभिलेखावर घेण्यात आली. तसेच, वादीने

निशाणी क्र. २४ सोबत रे.मु.नं. १२३/२०२४ या दाव्याच्या नकला दाखल केलेल्या आहेत. त्यावरून असे दिसते की, रे.मु.नं. १२३/२०२४ हा दावा दिनांक १४/०२/२०२४ रोजी दाखल केला होता. त्यामध्ये प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ हा प्रतिवादी होता व त्याची मुले तसेच पत्नी हे वादी होते. त्या दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी यांनी दिनांक ०३/०७/२०२४ रोजी तडजोड दाखल केली व दिनांक २७/०७/२०२४ रोजी तो दावा तडजोडीनुसार निकाली निघाला. यावरून हे स्पष्ट होते की, रे.मु.नं. १२३/२०२४ हा दावा दाखल करतेवेळी तसेच त्यामध्ये तडजोड करतेवेळी प्रतिवादी क्र. १ यास प्रस्तुत दाव्याची संपूर्ण माहिती होती. असे असतांना प्रतिवादी क्र. १ याने रे.मु.नं. १२३/२०२४ मध्ये तडजोड करून दावा मिळकत ही त्याच्या मुलांच्या नावे हस्तांतर केली. सदरची घटना प्रस्तुत दावा प्रलंबीत असतांना घडलेली असून ती दाव्याच्या अंतीम निकालावर परिणाम करणारी आहे. त्यामुळे रे.मु.नं. १२३/२०२४ मधील वादी म्हणजेच ज्यांच्या नावे प्रतिवादी क्र. १ याने दावा मिळकत हस्तांतर केली आहे त्यांना या दाव्यामध्ये प्रतिवादीपणात सामील करणे आवश्यक आहे. सबब, वादीने प्रस्तुत अर्जामध्ये केलेली मागणी योग्य व रास्त आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. निशाणी क्र. १८ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादींने प्रस्तुत अर्जात मागितलेली दुरुस्ती ही प्रस्तुत आदेश तारखेपासुन १४ दिवसांमध्ये करावी.

SANDHYA YUVRAJ SUL Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL Date: 2026.01.13 17:58:10 +0530

(**संध्या यु. सुळ**)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण– नेवासा
दिनांक – १३/०१/२०२६